आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
३ जानेवारी २०२६ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- भगवान गौतम बुद्धांचं ज्ञान, त्यांनी दाखवलेला मार्ग हा संपूर्ण मानवतेचा आणि कालातीत असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

- कृषीक्षेत्रासाठी केंद्र सरकारकडून मिळणारा निधी खर्च करण्यात राज्यांकडून होत असलेल्या दिरंगाईबाबत केंद्रीय कृषिमंत्र्यांकडून चिंता व्यक्त

- राज्यातल्या महानगरपालिका निवडणुकीची अंतिम उमेदवार यादी प्रसिद्ध, एकंदर १५ हजार ९३१ उमेदवार रिंगणात

- छत्तीसगडमध्ये १४ माओवादी ठार, तेलंगणात २० माओवाद्यांचं आत्मसमर्पण

**आणि**

- व्हेनेझुएलावर केलेल्या हल्ल्यानंतर अध्यक्ष निकोलस मडुरो सपत्निक अमेरिकेच्या ताब्यात, इतरत्र हलवल्याची अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची माहिती

**<><><><><>**

भगवान गौतम बुद्धांचं ज्ञान, त्यांनी दाखवलेला मार्ग हा संपूर्ण मानवतेचा आणि कालातीत आहे. भगवान बुद्ध सर्वांचे आहेत आणि ते सर्वांना जोडून ठेवतात, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. नवी दिल्लीतल्या राय पिथोरा सांस्कृतिक संकुलात, भगवान बुद्धांशी संबंधित, पवित्र पिप्रावा अवशेषांच्या, भव्य आंतरराष्ट्रीय प्रदर्शनाचं उद्घाटन केल्यानंतर ते बोलत होते. सव्वाशे वर्षांच्या प्रतीक्षेनंतर हे अवशेष भारतात परत आल्याबद्दल प्रधानमंत्र्यांनी आनंद व्यक्त केला.

***होल्ड... बाईट- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी***

हे अवशेष भारताबाहेर नेणाऱ्यांसाठी त्या फक्त निर्जीव वस्तू होत्या, म्हणून या वस्तूंचा लिलाव करायचा प्रयत्न त्यांनी केला, पण भारतानं तसं होऊ न देता भगवान बुद्धांच्या कर्मभूमीत हे अवशेष परत आणले, असं प्रधानमंत्री म्हणाले.

भगवान बुद्धांशी संबंधित विविध ठिकाणी असलेले त्यांचे अवशेष म्हणजे त्यांच्या संदेशाचं जिवंत प्रतीक आहे, असं त्यांनी सांगितलं. भारताने हे अवशेष विज्ञान आणि अध्यात्म या दोन्ही दृष्टींनी सांभाळून ठेवले आहेत, तसंच जगभरात अशा प्रकारच्या ठिकाणांच्या विकासासाठी शक्य होईल ते योगदान देण्याचा भारताचा प्रयत्न आहे, असंही प्रधानमंत्र्यांनी नमूद केलं.

<><><><><>

रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज पहिल्या वंदे भारत स्लीपर रेल्वेगाडीची पाहणी केली. लांब पल्ल्याच्या आणि रात्रभर प्रवासाकरता या गाडीची रचना केली असून जानेवारी अखेरपर्यंत गुवाहाटी ते कोलकाता मार्गावर ही गाडी धावू लागेल, अशी माहिती त्यांनी वार्ताहरांशी बोलताना दिली. याशिवाय, वर्षभरात अशा १२ गाड्या सुरू करण्याचं उद्दिष्ट आहे, असं ते म्हणाले. प्रवाशांसाठी आरामदायी बर्थ, स्वयंचलित दरवाजे, आधुनिक स्वच्छतागृहं अशा अद्ययावत सोयीसुविधा गाडीत उपलब्ध असल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

कृषीक्षेत्रासाठी केंद्र सरकारकडून मिळणारा निधी खर्च करण्यात होत असलेल्या दिरंगाईबाबत केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंग चौहान यांनी आज चिंता व्यक्त केली. नवी दिल्ली इथं राज्यांच्या कृषीमंत्र्यांच्या बैठकीत ते आज बोलत होते. या विलंबामुळे राज्यांना पुढचा निधी मिळायला उशीर होतो, त्यामुळे खर्चासाठी सुनियोजित धोरण आखावं, असं आवाहन त्यांनी केलं. पात्र लाभार्थ्यांच्या कागदपत्रांची पडताळणी तत्परतेनं करावी, पीकविमा योजनेचा विस्तार करावा, तसंच बियाणं आणि खतांच्या उपलब्धतेबाबत केंद्राबरोबर सतत संपर्कात रहावं अशा सूचना चौहान यांनी केल्या. प्रधानमंत्री राष्ट्रीय कृषी विकास योजना आणि कृषोन्नती योजना यांच्या अंमलबजावणीचा आढावा या बैठकीत घेण्यात आला.

महाराष्ट्रासह उत्तरप्रदेश, राजस्थान, गुजरात, महाराष्ट्र, ओदिशा, सिक्किम, उत्तराखंड, तेलंगण आणि मिझोरामचे कृषीमंत्री बैठकीला उपस्थित होते.

<><><><>

राष्ट्रीय शिक्षण धोरण, देशाच्या नवीन पिढीला गुलामगिरीच्या मानसिकतेतून बाहेर काढेल असा विश्वास केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी आज नागपुरात एका कार्यक्रमात व्यक्त केला. भारत हा युवाशक्तीचा देश आहे. युवाशक्ती आणि भावी पिढ्यांना मातृभाषेतून तसंच स्पर्धात्मक आणि कौशल्याधारित अभ्यासाच्या माध्यमातून सबळ करणं ही शिक्षण विभागाची जबाबदारी आहे, असं त्यांनी सांगितलं. युवकांनी केवळ रोजगार शोधणारे नाही, तर रोजगार निर्मिती करणारे होणं गरजेचं आहे आणि राष्ट्रीय शिक्षण धोरण त्या दिशेनं प्रयत्न करत आहे, असंही प्रधान म्हणाले.

<><><><>

राज्यातल्या महानगरपालिका निवडणुकीसाठी १५ हजार ९३१ उमेदवार रिंगणात आहेत, अशी माहिती राज्य निवडणूक आयोगानं आज दिली. २९ महानगरपालिकांमधल्या २ हजार ८६९ प्रभागांमधून हे उमेदवार रिंगणात आहेत. या निवडणुकीसाठी एकंदर ३३ हजार ४२७ अर्ज आले होते. त्यातले २४ हजार ७७१ अर्ज वैध ठरले होते. त्यापैकी ८ हजार ८४० उमेदवारांनी अर्ज मागे घेतल्याचं निवडणूक आयोगानं सांगितलं. राज्यात सर्वाधिक १ हजार ७०० उमेदवार मुंबई महानगरपालिकेच्या रिंगणात आहे. त्याखालोखाल १ हजार १६६ उमेदवार पुणे महानगरपालिका निवडणुकीत नशीब आजमावत आहेत. नागपूरमध्ये ९९३ उमेदवार नगरसेवकपदासाठी इच्छुक आहेत. तर सर्वात कमी, २३० उमेदवार इचलकरंजी महानगरपालिकेच्या १६ प्रभागांसाठी निवडणूक रिंगणात आहेत.

**<><><><><>**

छत्तीसगडमध्ये आज दोन वेगवेगळ्या ठिकाणी सुरक्षा दलांशी झालेल्या चकमकीत एकंदर १४ माओवादी मारले गेले. यात बस्तर भागातल्या बिजापूर जिल्ह्यात २ आणि सुकमा जिल्ह्यात १२ माओवाद्यांचा समावेश आहे. सुकमा जिल्ह्यात घटनास्थळावरू सुरक्षादलांनी एके-४७ रायफल, एसएलआर रायफल आणि इतर शस्त्रंही जप्त केली.

तर, तेलंगणात सीपीआय माओवादी संघटनेच्या पीपल्स लिबरेशन गुरिल्ला आर्मी बटालियनचा कमांडर देवा बारसे याच्यासह २० माओवाद्यांनी पोलीस महासंचालक शिवधर रेड्डी यांच्यासमोर आत्मसमर्पण केलं. त्यांच्याकडून ४८ शस्त्रं, मोठ्या प्रमाणात दारूगोळा आणि २० लाख ३० हजार रुपये रोख रक्कम जप्त करण्यात आली.

**<><><><><>**

२०२५ मधे भारताच्या प्रगतीने जगाचं लक्ष वेधून घेतलं. जगभरात अनिश्चिततेचं वातावरण असताना भारत मात्र आपल्या ध्येयाकडे ठामपणे आणि सातत्यपूर्ण वाटचाल करत राहिला. या विषयी सविस्तर माहिती आता ऐकुया....

***होल्ड... व्हीसी-***

*(भारतानं गेल्या दशकभरात १७ कोटींहून अधिक नागरिकांना आत्यंतिक दारिद्र्यातून बाहेर काढल्याबद्दल जागतिक बँकेने भारताचं कौतुक केलं आहे. महाराष्ट्र, बिहार, उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश आणि पश्चिम बंगाल या राज्यांमध्ये आत्यंतिक दारिद्र्यात दोन तृतीयांश घट झाल्याचं जागतिक बँकेच्या अहवालात म्हटलं आहे. गेल्या १० वर्षांत भारताच्या ग्रामीण भागातल्या आत्यंतिक दारिद्र्याचं प्रमाण १८ टक्क्यावरून २ पूर्णांक ८ दशांश टक्क्यापर्यंत आल्याचंही अहवालात नमूद केलं आहे. संयुक्त राष्ट्रांच्या शाश्वत विकास उद्दिष्ट निर्देशांकात भारताने पहिल्यांदाच पहिल्या शंभर देशांमध्ये स्थान मिळवलं आहे. स्वच्छता, आरोग्य,*

*आर्थिक समावेशन आणि डिजिटल प्रशासन या क्षेत्रातल्या प्रगतीमुळे देशाला ही कामगिरी करता आली. गेल्या दशकभरात भारतीय नागरिकांच्या जीवनात आर्थिक सुबत्ता आली आहे. जनधन योजनेमुळे सध्या देशातल्या ८९ टक्के प्रौढ नागरिकांकडे बँक खाती आहेत. या योजनेने नागरिकांसाठी आर्थिक सुबत्तेचं दार उघडून दिल्याचं जागतिक बँकेच्या अहवालात म्हटलं आहे.)*

**<><><><><>**

केंद्र सरकारने नुकत्याच संमत केलेल्या विकसित भारत जी राम जी विधेयकामध्ये चार वेगवेगळ्या श्रेणीत कामांची विभागणी करण्यात आली आहे. याबद्दल ऐकूया जालन्याचे ओमप्रकाश उढाण यांची प्रतिक्रिया.

***होल्ड... बाईट- ओमप्रकाश उढाण***

**<><><><><>**

व्हेनेझुएलाचे अध्यक्ष निकोलस मडुरो आणि त्यांच्या पत्नी सिलिया फ्लोरेस यांना अमेरिकेनं ताब्यात घेतलं असून ते अमेरिकेच्या लढाऊ नौकेवर आहेत आणि न्यूयॉर्कमध्ये त्यांच्यावर खटला चालवला जाईल, आहे, अशी माहिती अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आज दिली. मडुरो यांच्यावर दहशतवाद, अंमली पदार्थांचा पुरवठा, अमेरिकेविरोधात मशीनगन आणि इतर संहारक शस्त्रांचा वापर यासारखे आरोप आहेत. तसंच, आता व्हेनेझुएलाच्या भविष्याचा निर्णय अमेरिका घेईल, असंही ट्रम्प यांनी एका मुलाखतीत स्पष्ट केलं.

अमेरिकेनं आज सकाळी व्हेनेझुएलावर मोठ्या प्रमाणात हल्ला केला. व्हेनेझुएलानं देशात आणीबाणी जाहीर केली आहे. अमेरिकेची ही कारवाई अतिशय गंभीर असून व्हेनेझुएलाचे राष्ट्राध्यक्ष मडुरो आणि त्यांच्या पत्नी कुठे आहे आणि कोणत्या अवस्थेत आहेत हे सांगावं, अशी मागणी उपाध्यक्ष डेल्सी रॉड्रीग्ज यांनी केली. या प्रकरणी संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेच्या आपातकालीन बैठकीची मागणीही व्हेनेझुएलानं केली आहे.

रशिया, क्यूबा, इराण यासारख्या देशांनी अमेरिकेच्या हल्ल्याचा निषेध केला. व्हेनेझुएलाच्या सार्वभौमत्वावर हे अतिक्रमण असल्याचं या देशांनी म्हटलं आहे. हे आक्रमण आणखी न वाढवण्याचं आवाहन रशियानं केलं. सर्व मुद्दे चर्चेद्वारे सोडवण्याचं आणि त्यासाठी मदत करण्याची तयारी रशियानं दाखवली. आंतरराष्ट्रीय समुदायानं या प्रकरणी लवकर प्रतिक्रिया द्यावी असं आवाहन क्युबानं केलं आहे.

**<><><><>**

न्यूझीलंडविरुद्धच्या ३ एकदिवसीय मालिकेसाठी भारतीय संघाची आज घोषणा झाली. संघाचं नेतृत्व शुभमन गिल याच्याकडे आहे, तर उपकर्णधारपदाची जबाबदारी श्रेयस अय्यरला देण्यात आली आहे. गोलंदाज मोहम्मद सिराज याचंही संघात पुनरागमन झालं आहे. ११ ते १८ जानेवारी दरम्यान भारतात ही मालिका होणार आहे. रोहित शर्मा, विराट कोहली यांच्यासह इतर खेळाडूंचाही संघात समावेश करण्यात आला आहे.

**//<><><><>//**